**महाराष्ट्र शासन**
**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,**
**३, चर्च रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**<u>बंद पडलेल्या / मान्यता रद्द केलेल्या विजाभज प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळा हस्तांतर व स्थलांतरणाने अन्य स्वंयसेवी संस्थेस हस्तांतरीत व स्थलातरण करण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत जाहिरात</u>**

महाराष्ट्र शासनाच्या संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या मुला-मुलींसाठीच्या खालील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा (ज्या बंद पडलेल्या आहेत किंवा अन्य कारणामुळे ज्यांची मान्यता काढलेली आहे अशा) स्थलांतर व हस्तांतरणाने नव्याने सुरु करण्यासाठी इच्छुक स्वंयसेवी संस्थेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | आश्रमशाळा चालविल्या जाणाऱ्या संस्थेचे नांव | आश्रमशाळेचे नाव | आश्रमशाळा चालविण्यात येत असलेले वर्ग | मान्यता रद्द आदेश दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | लोकजागृती शिक्षण संस्था, गोसे (बु), ता.पावनी, जि.भंडारा | बाबा खंताळू प्राथमिक आश्रमशाळा गोसे (बु), ता.पावनी, जि.भंडारा | इ.१ली ते इ ७ वी | ४२६ ३०/५/२०१३ | |
| | लोकजागृती शिक्षण संस्था, गोसे (बु), ता.पावनी, जि.भंडारा | बाबा खंताळू माध्यमिक आश्रमशाळा गोसे (बु), ता.पावनी, जि.भंडारा | इ. ८वी ते १० वी | ४२५ ३०/५/२०१३ | |

अर्जाचा नमूना, अटी व शर्ती, अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी इत्यादी माहिती, सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा (दुरध्वनी क्र.०७१८४/ २५३०२०) यांचे कार्यालयात दि.२३/०१/२०१८ पासून दि.२२/०२/२०१८ पर्यंत उपलब्ध होवू शकेल.

**बंद/मान्यता रद्द करण्यात आलेल्या आश्रमशाळा अन्य संस्थेस हस्तांतर करण्या संबंधीच्या अटी व शर्ती :-**

१) बंद/मान्यता रद्द झालेली आश्रमशाळां बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट असावी. सदर आश्रमशाळा बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट नसल्यास तिचा हस्तांतर/स्थलांतरणासाठी विचार केला जाणार नाही तसेच ती कायमस्वरूपी बंद करण्यात येईल.

२) बंद/मान्यता रद्द झालेल्या आश्रमशाळा स्थलांतरीत/हस्तांतरीत करण्याकरीता त्या आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या विचारात घेणे आवश्यक नाही.

३) बंद किंवा मान्यता र द्द केलेल्या आश्रमशाळांच्या ठिकाणांसहीत नावांची यादी , त्या भागातील दोन प्रसिद्ध दैनिक वर्तमानपत्रात तसेच विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल आणि इच्छूक संस्था, एन.जी.ओ. यांच्याकडून अर्ज मागविण्यात येतील. तसेच अशा प्रकारचे खुले प्रस्ताव मागवितांना सदर संस्था त्या जिल्ह्यातील किंवा लगतच्या जिल्ह्यातील असणे आवश्यक राहील. बंद/मान्यता रद्द झालेली अनुदानित आश्रमशाळा ज्या महसुली विभागामध्ये सुरु होती त्याच महसुली विभागामध्ये स्थलांतरीत/ हस्तांतरीत करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येतील. तसेच अशा प्रकारच्या स्थलांतर/हस्तांतरणाने बाधित होणाऱ्या पालक, नागरिक आणि शिक्षक व शिक्षकेतर वर्ग यांचेकडून सूचना मागविण्यात याव्यात.

४) इच्छुक संस्थेने जाहिरातीस अनुसरुन विहित नमून्यात संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग यांचेकडे अर्ज करावा लागेल.

५) इच्छुक स्वयंसेवी संस्थेकडे संस्था नोंदणी अधिनियम १८६०, सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गतचे नोंदणी प्रमाणपत्र असावे तसेच धर्मादाय आयुक्तांकडे या संस्थेची नोंदणी केलेली असावी व त्यात स्पष्टपणे शैक्षणिक कार्य किंवा शाळा चालविण्याबाबतचे उद्देश असावेत.

६) संस्थेने नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेच्या घटनेची प्रत सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन अर्जासोबत जोडावी. संस्था जेथे कार्य करणार आहे, त्या जिल्ह्यात/ठिकाणामध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र असावे. आश्रमशाळा चालविण्यासाठी इच्छुक असलेल्या संस्थेस आश्रमशाळा/शैक्षणिक संस्था चालविण्याचा किमान ४ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

७) संस्थेने अर्ज करतांना संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांच्या नावाने रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) एवढी रक्कम चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे. (सदरची रक्कम ना परतावा असेल)

८) अर्ज करतांना संस्थेच्या बँक खात्यात किमान रु.१०.०० लक्ष (रुपये दहा लक्ष फक्त) एवढी रक्कम जमा असणे आवश्यक आहे. यासाठी संबंधीत बँकेचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. संस्थेकडे १ वर्षासाठी खर्च करता येतील इतकी रक्कम त्यांच्या बँक बचत किंवा चालू खात्यावर शिल्लक असणे अनिवार्य आहे.

९) संस्थेने लगतच्या पाच वर्षातील लेखा परिक्षणाच्या अहवालाची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

१०) संस्थेकडे किमान ३ एकर जागा स्वत:च्या मालकीची अथवा भाडेकरारावर घेतली असल्यास संस्था स्थलांतरणाने/ हस्तांतरणाने आश्रमशाळा घेण्यास पात्र राहील.

११) संस्थेस धर्मादाय आयुक्तानी किंवा शासनाने दंड केलेला असल्यास त्याबाबतची माहिती अर्जासोबत जोडावी. संस्थेच्या सुरु असलेल्या शाळातील गैरप्रकाराबाबत इतर विभागांनी संस्थेच्या विरुध्द यापूर्वी केलेली कार्यवाही, याबाबतची माहिती देणे बंधनकारक आहे. संस्थेने यापूर्वी निधीचा अपहार केल्याच्या तक्रारी प्राप्त असल्यास त्याची माहिती द्यावी.

१२) संस्थेने यापूर्वी शासनाविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती किंवा कसे ? असल्यास, ती प्रलंबित आहे का, किंवा निकाल लागला असल्यास त्याची माहिती द्यावी.

१३) कोणत्याही शाळेचे हस्तांतरण अन्य नविन संस्थेकडे करण्यात आल्यानंतर सदर शाळेतील सर्व शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन सदर शाळेत करण्यात येईल.

**<u>सर्वसाधारण अटी शर्ती</u>**

१. प्रादेशिक स्तरावरील समिती तसेच राज्यस्तरीय समिती शासनास प्रस्तावांची शिफारस करेल. तद्नंतर शासन सक्षम व पात्र असणाऱ्या संस्थेस बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या किंवा काढून घेतलेल्या आश्रमशाळा हस्तांतरण करण्याबाबत यथायोग्य निर्णय शासन स्तरावरुन गठीत समितीव्दारे घेतला जाईल व शासनाचा तो निर्णय अंतिम राहील.

२. विद्यार्थी संख्या अभावी बंद पडलेल्या शाळा पुन्हा त्याच ठिकाणी सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

३. बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळेत जेवढे शैक्षणिक वर्ग सुरु करण्यात आले होते, ते सर्व वर्ग आश्रमशाळा हस्तांतरीत/स्थलांतरीत झालेल्या ठिकाणी एकाच वेळी सुरु करणे आवश्यक राहील. तसेच या बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या आश्रमशाळामधील मान्यता प्राप्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याची जबाबदारी नविन संस्थेची राहील. शाळा हस्तांतरणाच्या/ स्थलांतरणाच्या अनुषंगाने कोणत्याही नविन पदास मान्यता दिली जाणार नाही.

४. हस्तांतरीत/स्थलांतरीत झालेल्या ठिकाणी आश्रमशाळा शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून ३० दिवसात सुरु करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत आश्रमशाळा सुरु न केल्यास सदर आश्रमशाळेचे हस्तांतरण/स्थलांतरण आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

५. बंद पडलेल्या/मान्यता रद्द करण्यात आलेल्या किंवा विद्यार्थी पटसंख्या कमी झाल्याने अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या आश्रमशाळेतील सर्व मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती हस्तांतरीत झालेल्या शाळेमध्ये करण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांना ३० दिवसात तेथे रुजू होणे बंधनकारक राहील. अशा अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत या विभागाच्या शासन निर्णय क्र. याचिका-२०१५/प्र.क्र.१५०/विजाभज-२, दि.१.४.२०१६ व शासन शुध्दीपत्रक क्र.याचिका-२०१५/प्र.क्र.१५० /विजाभज-२, दि.१७.१०.२०१६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

६. जे शिक्षक किंवा शिक्षकेत्तर कर्मचारी हस्तांतरीत झालेल्या आश्रमशाळेच्या ठिकाणी उचित कारणाशिवाय ३० दिवसाच्या आत रुजू होणार नाहीत, अशा कर्मचाऱ्यांना तीन संधी दिल्या जातील. त्यानंतरही ते नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास त्यांना सेवेची आवश्यकता नाही, असे समजून त्यांची सेवा समाप्त करण्यात येतील व अशा कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागेवर जिल्हयातील, विभागातील किंवा राज्यातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या यादीतून सेवाजेष्ठता कर्मचाऱ्यांची समायोजनाने नियुक्ती करण्यात येईल.

७. हस्तांतरीत/स्थलांतरीत झालेल्या शाळा उत्तमरित्या संस्थेच्या स्वनिधीतून चालविणे ही जबाबदारी प्रामुख्याने संबंधीत स्वयंसेवी संस्थेची राहील. देय बाबींवरील अनुज्ञेय खर्चाची प्रतिपूर्ती वेळोवेळी शासनाचे ध्येयधोरण व अनुदानाचे उपलब्धतेनुसार केली जाईल,अशा संमतीचे हमीपत्र संस्थेने सोबत जोडणे बंधनकारक राहील.

८. शासनाच्या आदिवासी विकास विभाग किंवा सामाजिक न्याय विभागाने यापूर्वी अर्जदार संस्थेची एखादी शाळाची मान्यता रद्द केले असल्यास अथवा मान्यता काढून घेतली असल्यास किंवा काही कारणास्तव बंद पडली असल्यास पुन्हा अन्य संस्थेची शाळा अशा अर्जदार संस्थेकडे हस्तांतर/स्थलांतरण करणेबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

९. प्राप्त झालेल्या अर्जावर शासनाचा निर्णय अंतिम असेल.

१०. अपूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रे न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११. सदर जाहिरीतीनुसार मागविण्यात आलेले प्रस्ताव कोणत्याही सबबीविना रद्द करण्याचे अधिकार शासनाकडे असतील.

१२. सर्व कागदपत्रासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. प्रस्ताव अपूर्ण असल्यास त्रुटी पूर्तता करणेबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३. ज्या जिल्हयातील आश्रमशाळा करीता अर्ज मागविण्यात येत आहे, त्याच जिल्हयातील इच्छुक संस्थेने अर्ज करावा. इतर जिल्हयातील संस्था अर्ज करण्यास पात्र असणार नाहीत.

१४. परिपूर्ण प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक टाकून व प्रत्येक पृष्ठावर संस्था सचिवांनी स्वाक्षरी करुन दि. २२/२/२०१८ पूर्वी कार्यालयीन वेळेत संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा यांचे कार्यालयात सादर करावेत व पोच पावती घ्यावी. विहित मुदतीनंतर भरलेले चलन किंवा सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१५. ज्या अर्जदार संस्थेच्या प्रस्तावांना आश्रमशाळा चालविण्यासाठी मान्यता मिळेल ते प्रस्ताव वगळून इतर सर्व संस्थेचे प्रस्ताव अमान्य करण्यात आल्याचे समजावे. त्यासाठी वेगळ पत्रव्यवहार केला जाणार नाही.

स्थळ : पुणे संचालक,
दिनांक : जानेवारी २०१८ विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

# अर्जाचा नमूना
## (प्रत्येक ठिकाणासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

-------------------------------- ही मान्यता काढण्यात आलेली प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा स्थलांतरण व हस्तांतरणाने मौजे ----------- ता.---------- जि.या ठिकाणी चालू करण्यासाठी मान्यता मिळण्याबाबतचा अर्ज.

(कार्यालयीन उपयोगासाठी)

अ) अर्ज क्रमांक ------ ब) अर्जासाठी भरलेल्या रु----- रक्कमेचा पावती क्र. दि..

क) नापरतावा रक्कम चलन क्र. ड) रक्कम रु. --------------

इ) शाळेचा प्रकार : प्राथमिक/माध्यमिक ---------- शाळा मागणी ठिकाण

---

संस्थेने भरण्यासाठी

(अर्जासोबत आवश्यक त्या मुद्याच्या पुष्टयर्थ पुरावे जोडावेत)

**१. संस्थेने नांव व पूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक :**

**२. संस्था स्थापनेचा वर्ष :**

**३. संस्था पंजीबध्द क्रमांक व दिनांक**

अ) सार्वजनिक विश्‍वस्त अधिनियम १९५० :- क्रमांक दिनांक

आ) संस्था नोंदणी अधिनियम १८६० :- क्रमांक दिनांक

इ) संस्थेच्या लिखीत घटनेची प्रत जोडावी :-

**४. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक :-**

अ) अध्यक्ष :-

आ) उपाध्यक्ष :-

इ) सचिव :-

ई) कोषाध्यक्ष :-

**५. नियोजित प्राथमिक/माध्यमिक शाळेचे नांव**

**६. ज्या ठिकाणी नियोजित शाळा उघडावयाची आहे त्या गावाचे नांव व संपूर्ण पत्ता**

**७. शिक्षणाचे माध्यम**

**८. संस्थेच्या बँकेचे नांव व पत्ता :-**

अ) बँकेचे नांव

आ) खाते क्रमांक

इ) अर्ज करण्याच्या दिवशी बँकेत असलेली शिल्लक (शिल्लकेबाबत पासबुक छायाप्रत जोडावी)

ई) अर्जासोबत संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नावे रु. १० हजार भरलेल्याचलनाची क्रमांक व दिनांक (छायाप्रत जोडावी)

उ) मागील ५ वर्षाचे सनदी लेखापालांचे लेखा परिक्षण अहवाल जोडावेत.

**९. इमारतीबाबत :- (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.विभशा-२००२/ प्रक्र.३९/मावक-६, दि.१६.१०.२००३मधील परिशिष्ठ-४नुसार खालील मुद्यांवरील माहिती भरावी)**

क) इमारत संस्थेच्या मालकीची /भाडयाची :

ख) इमारत जेथे आहे तेथील पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :-

ग) इमारतीचे एकूण चटई क्षेत्र :-

घ) उपलब्ध असलेल्या खोल्यांची संख्या क्षेत्रफळ :-

च) स्वच्छतागृहांची संख्या व त्याचे क्षेत्रफळ :-

छ) स्नानगृहांची संख्या व त्याचे क्षेत्रफळ :-

ज) स्वंयपाक खोली व कोठीगृहाचे क्षेत्रफळ :-

झ) मुलीसाठी स्वतंत्र निवासाची व तद्अनुषंगीक व्यवस्था इ. खोल्यांचीच

ट) इमारत भाडयाची असल्यास इमारत मालकाचे संमती पत्र

ठ) भाडे करारनामा (भाडयाची रक्कम व किती वर्षासाठी भाडेतत्वावर) :-

ड) इमारतीच्या मालमत्ता नोंदवहीचा उतारा सादर केला आहे काय ?

असल्यास इमारत घर क्रमांक :-

**१०. स्वंयसेवी संस्थेचा इतर शैक्षणिक/सामाजिक कार्याचा अनुभव :**

**<u>अ) शैक्षणिक योजना :-</u>** शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे चालवित असल्यास त्याबाबतची माहिती.

| अ.क्र | उपक्रमांचे नांव | मान्यता वर्ष | सद्यस्थिती | अनुदानित/विना अनुदानित |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**ब) समाज कल्याण विविध विभागाच्या योजना.आदिवासी इ/महिला व बाल विकास/**

**: राबवित असल्यास त्याबाबतचा तपशिल**

| अ.क्र | उपक्रमांचे नांव | मान्यता वर्ष | सद्यस्थिती | अनुदानित/विना अनुदानित |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**११. संस्थेच्यावतीने केंद्र शासनामार्फत उपक्रम राबविण्यात येत असल्यास ?**

- उपक्रमाचे नांव :-
- मान्यता वर्ष :-
- अनुदानित/विना अनुदानित :

**१२. प्राथमिक /माध्यमिक आश्रमशाळा ज्या गावांत उघडावयाची आहे त्या गावाची माहिती**

- गावाची एकूण लोकसंख्या व विजाभजची लोकसंख्या
- गावाच्या १० कि.मी परिसरातील विमुक्त जाती भटक्या जमातीची गावनिहाय लोकसंख्या
- गावामध्ये सध्या कार्यरत असलेल्या शाळांची माहिती.

| अ.क्र | शाळेचे नांव | स्थापना वर्ष | विद्यार्थी संख्या अंदाजे | कोणत्या वर्गापर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

ड) **गावापासून १० कि.मी च्या परिसरात कार्यरत असलेल्या प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळेची माहिती :**

| अ.क्र | शाळेचे नांव | स्थापना वर्ष | विद्यार्थी संख्या अंदाजे | कोणत्या वर्गापर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

इ) गावांमध्ये पक्के रस्ते आहे काय होय /नाही

फ) पुरेशी विजेची व्यवस्था आहे काय होय /नाही

ग) पिण्याच्या पाण्याची व वापरण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे काय होय /नाही

**१३. नियोजित शाळेमध्ये उपलब्ध केल्या जाणाऱ्या प्राथमिक सुविधेबाबत : (लिहिण्यासाठी जागा अपुरी असल्यास स्वतंत्र जोडपत्र जोडावे)**

- खेळाचे मैदान उपलब्ध आहे काय असल्यास क्षेत्रफळ :-
- सर्व सोयींनी युक्त फर्निचर उपलब्ध आहे काय असल्यास तपशिल :-
- वैद्यकिय सुविधा किती अंतरावर आहे :-
- नियोजित शाळेच्या ठिकाणापर्यंतचा पक्का रस्ता आहे काय :-
- प्रस्तावित शाळेच्या ठिकाणी पुरेशी पाण्याची व्यवस्था आहे काय :-
- प्रस्तावित शाळेच्या ठिकाणी विजेची व्यवस्था आहे काय :-

**१४. इतर** :-

- संस्थेविरुध्द तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्याविरुध्द कोणत्या प्रकारचा गुन्हा दाखल झालेला आहे काय असल्यास त्याबाबत माहिती :- होय/नाही (असल्यास स्वतंत माहिती द्यावी)
- संस्था चालवित असलेल्या शासकीय उपक्रमाबाबत संस्थेविरुध्द शिस्त भंगाची कोणती कार्यवाही झालेली आहे काय :- होय/नाही (असल्यास स्वतंत माहिती द्यावी)
- संस्था शासनाने अनुदान न दिल्यास शाळा स्वखर्चाने चालविण्यास तयार आहे काय? होय/नाही
- संस्थेने अथवा संस्थेतील कर्मचाऱ्यांचे शासन/संचालक/प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेविरुध्द न्यायालयात याचिका दाखल केली असल्यास तपशिल :-

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी/आम्ही खाली सह्या करणार श्री/श्रीमती ----------------- -- अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव/कार्याध्यक्ष म्हणून ----- ---------- या संस्थेत पदाधिकारी आहे/आहोत. मी/आम्ही प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, वर दिलेली सर्व माहिती व सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे पुर्णत खरी व सत्य असून ती चुकीची किंवा खोटी आढळून आल्यास मी आम्ही फौजदारी शिक्षेस पात्र होईन किंवा संस्थेला भविष्यात आश्रमशाळा मंजूर झाल्यानंतर जर देण्यात आलेली माहिती खोटी आढळून आली तर आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याचे व शासनाकडून देण्यात आलेले अनुदान पुर्णपणे सव्याज परत करण्याचे बंधन माझ्यावर/आमच्यावर राहील असे संस्थेच्या वतीने मी /आम्ही प्रतिज्ञा पूर्वक लिहून देत आहोत.

**ठिकाण :**

**दिनांक :** **संस्थेच्या पदाधिकाऱ्याचे पुर्ण नाव सही व शिक्का**

# परिशिष्ट

## १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा

**करारनामा लिहून देणार :**
अध्यक्ष श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------------
उपाध्यक्ष श्री/श्रीमती -------------------------------------------------------------------------
सचिव श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------------
(संस्थेने अधिकार दिलेले कोणतेही पदाधिकारी संस्थेच्या ठरावासह)
संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता ---------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------

**करारनामा लिहून घेणार :**
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, ---------------------------------------- येणेप्रमाणे करारनामा लिहून देण्यात येतो की,

१. आश्रमशाळा बाबतचा प्रस्ताव ----------- ठिकाणचा असून हे ठिकाण बृहत आराखडयात आहे. या प्रस्तावात पान क्र. १ ते --------- पाने असून जोडपत्र ------ ते -------- आहेत. शासनाने आखुन दिलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दि.१६.१०.२००३ सोबतच्या परिशिष्ट १ ते ------- आणि इतर सर्व अटी आणि शर्ती मी/आम्ही वाचलेले असून त्या आम्हास पूर्ण मान्य आहेत/असा उल्लेख असावा.

२. मान्यता प्राप्त आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सोयी सवलती देणे आवश्यक असून त्या दिल्याबद्दल खात्री करण्यासाठी शासनाकडून त्रयस्थ संस्थेमार्फत संस्थेची तपासणी करण्यात येणार असून त्याची श्रेणी निश्चित केल्या जाईल. निश्चित केल्या जावून पुढील मान्यतेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

३. आमच्या संस्थेने नवीन प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा सुरु करण्यासाठी विहित नमून्यात अर्ज केलेला आहे.

४. अर्जातील, परिशिष्टातील सर्व अटी व शर्ती माझ्या/आमच्या संस्थेस मान्य आहेत.

५. आश्रमशाळा चालविण्यास शासनाने परवानगी दिल्यास वरील अटी शर्तीनुसार निवासी आश्रमशाळेसाठी सर्व सोयी सुविधा दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्याची हमी या करारपत्रकानुसार देण्यात येत आहे.

६. भविष्यात वेळोवेळी आश्रमशाळेबाबत शासन ज्या नवीन अटी व शर्ती वा निकष लागू करेल त्या अनुषंगाने कार्यवाही करणे आमच्या संस्थेवर बंधनकारक राहील.

७. शासनाकडून आश्रमशाळेकरीता जे अनुदान सुत्र निश्चित राहील त्या दराने काही कारणाने अनुदान न मिळाल्यास संस्था स्वत: खर्च करण्याचे मान्य करीत आहे.

८. आश्रमशाळेतील प्रवेशार्थी आणि आश्रमशाळेचा गुणात्मक दर्जा सातत्याने उत्कृष्ट श्रेणीचा राहील याबाबत या करारपत्राव्दारे हमी देण्यात येत आहे.

९. मी/आम्ही सर्व माहिती, सुचना, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचलेल्या असून त्यानुसार अर्ज भरलेला आहे.

**ठिकाण -**
**दिनांक -**

| **करारपत्र लिहून देणार** | **करारपत्र लिहून घेणार** | **साक्षीदार** |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| शिक्का | शिक्का | नांव |
| नांव | नांव | पत्ता |
| पत्ता | पत्ता | |

**शासन निर्णय क्र.विभशा-२०१२/प्र.क्र.२२१/विजाभज-२ , दि.१९.१२.२०१६ चे कार्यपध्दती नियम क्र.३ नुसार आश्रमशाळेच्या स्थलांतरण व हस्तांतरणाने बाधीत होणाऱ्या पालक, नागरीक आणि शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग यांचेकडून सुचना मागविण्याबाबत.**

सर्व संबंधीतांस कळविण्यात येते की, ----------- ---------------------- या संस्था संचलित प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळा ---------- मु.पो.------- ता.---------- जि. ----------- या मान्यता रद्द केलेल्या व सद्यस्थितीमध्ये बंद असलेल्या आश्रमशाळेचे हस्तांतरण व स्थलांतरण करण्याकरीता ईच्छुक स्वंयसेवी संस्थेकडून/एनजीओकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यासंबंधीची स्वतंत्र जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या जाहिरातीचे अनुषंगाने प्राप्त अर्जावर नियमानुसार शासन स्तरावरुन यथावकाश निर्णय होवून त्याप्रमाणे योग्य त्या संस्थेस ही --------------------- आश्रमशाळा हस्तांतरीत व स्थलांतरीत केली जाणार आहे.

तेव्हा, याबाबत ज्या कोणी पालक, नागरीक, शिक्षक व शिक्षकेत्तर वर्गास काही सुचना सादर करावयाच्या असतील, त्यांनी त्यांच्या सुचना कार्यालयीन वेळेत, शासकीय कामकाजाचे दिवशी संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर कराव्यात.

संचालक
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

(सदर निवेदन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी संबंधीत शाळेच्या गावातील सुचना फलकावर, शाळेच्या सुचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी व तसे केल्याचा अहवाल संचालनालयास सादर करावा.)

**आश्रमशाळा मागणीसंबंधीचे अर्जासोबत जोडावयाच्या साक्षांकित कागदपत्रांची यादी.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १ | सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झाल्याची प्रत |
| २ | संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी झालेबाबत प्रमाणपत्राची प्रत |
| ३ | संस्थेच्या लिखीत घटनेची धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली प्रत |
| ४ | प्राथमिक व माध्यमिक करीता रु.१०,०००/- अनामत रक्कम चलनाने कोषागारात भरल्याची प्रत. |
| ५ | संस्थेने बँक खात्यात रु.१०.०० लक्ष जमा असल्याबाबत बँकेच्या शाखाधिकाऱ्यांच्या पत्राची प्रत. |
| ६ | मागील ५ वर्षाचे सनदी लेखापालांनी संस्थेच्या केलेल्या लेखा परिक्षणाचे अहवाल. |
| ७ | संस्थेच्या पदाधिकारी व कार्यकारिणीतील सदस्य यांची नांवे, पूर्ण पत्ते, व्यवसाय, जात इत्यादी बाबीची माहिती. |
| ८ | संस्थेच्या इतर उपक्रमांची माहिती तसेच त्या संदर्भात सदर उपक्रमाच्या कामकाजाच्या बाबतीत झालेली दंडात्मक कार्यवाही, कामाच्या बाबतीत निकृष्ट व उत्कृष्ट शेरे, प्रतवारी इ.ची माहिती द्यावी. |
| ९ | यापूर्वी संस्थेच्या अंतर्गत आश्रमशाळा मंजूरी संदर्भात न्यायालयाने काही निर्णय दिलेला असल्यास त्याबाबत याचिका क्रमांक, दिनांक व निर्णयाची प्रत व संस्थेची भुमिका. |
| १० | संस्थेतील कोणत्याही पदाधिकाऱ्यास व कार्यकारिणी मंडळातील सदस्यास भारतीय दंड संहितेतील तरतूदीनुसार गुन्हयाबाबत शिक्षा झालेली त्याबाबतची माहिती. |
| ११ | संस्थेची स्वत:ची जागा/जमीन असल्यास ७/१२ चा उतारा. |
| १२ | संस्थेची स्वत:ची इमारत असल्यास, मालमत्तेबाबत उतारा. |
| १३ | इमारत भाडयाची असल्यास, मालकाचे भाडे करारपत्र |
| १४ | संस्थेकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सोईसुविधांची माहिती व त्यासंबंधातील कागदपत्रे |
| १५ | शासनाने ठरवून दिलेले नियम बंधनकारक असतील याबाबत संस्था प्रमुखांचे १०० /- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा |

# <u>स्वंयसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत माहिती</u>

| अ.क्र. | पदाधिकारी/हुद्दा | नांव व पूर्ण पत्ता (पिनकोड व दुरध्वनी क्रमांकासह) | वय | शिक्षण | जात | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | | | | | |
| २ | उपाध्यक्ष | | | | | |
| ३ | सचिव | | | | | |
| ४ | कोषाध्यक्ष | | | | | |
| ५ | सदस्य | | | | | |
| ६ | सदस्य | | | | | |
| ७ | सदस्य | | | | | |
| ८ | सदस्य | | | | | |
| ९ | सदस्य | | | | | |
| १० | सदस्य | | | | | |
| ११ | सदस्य | | | | | |

ठिकाण -

शिक्का

दिनांक -